**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मुंद्रा स्टील एण्ड अलॉय प्रा. लिमिटेड, प्लॉट नं.ई-१५, एम.आय.डी.सी. जेजुरी, तालुका - पुरंदर, जिल्हा - पुणे, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील एम.एस.बिलेट्स चे उत्पादन क्षमता विस्तारिकरण ६३.३३ ते ५६३.३३ मे.टन/दिन म्हणजे १,९००.० मे. टन/महिना ते १६,९००.० मे. टन/महिना करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मुंद्रा स्टील एण्ड अलॉय प्रा. लिमिटेड, प्लॉट नं.ई-१५, एम.आय.डी.सी. जेजुरी, तालुका - पुरंदर, जिल्हा - पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील एम.एस.बिलेट्स उत्पादन क्षमता विस्तारिकरण ६३.३३ ते ५६३.३३ मे. टन/दिन म्हणजे १,९००.० मे. टन/महिना ते १६,९००.० मे. टन/महिना करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक १७ जुलै, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५०, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२६६७ दिनांक १७ जुलै, २०१९ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, पुणे — **-अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, — **-सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-१ — **- समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे

श्री नितीन शिंदे, उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.
समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री शिंदे यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-१, मप्रनि मंडळ, पुणे यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मुंद्रा स्टील एण्डअलॉय लिमिटेड, प्लॉट नं.ई-१५, एम.आय.डी.सी. जेजुरी, तालुका - पुरंदर, जिल्हा - पुणे महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील एम.एस.बिलेट्स उत्पादन क्षमता विस्तारिकरण ६३.३३ ते ५६३.३३ मे. टन/दिन म्हणजे १,९००.०मे. टन/महिना ते १६,९००.० मे. टन/महिना करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ज्ञ समितीची म्हणजे SEIAA - State Environment Impact Assessment Authority/ राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये **संवर्ग ब** मध्ये मोडत आहे.

त्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ञ मुल्यांकन समितीस पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यासाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला व त्यास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ञ मुल्यांकन समितीने (एस.ई.ए.सी-१) १५४ व्या बैठकीत दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजी प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान केली.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-१, मप्रनि मंडळ, पुणे यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १५-०६-२०१९ रोजी जाहिर सुनावणीची सूचना दिलेली होती. मात्र इंग्रजीतील जाहिर सुनावणी सुचनेत अनवधानाने तारीख चुकीची छापून आल्याने राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २७ जून, २०१९ रोजी शुध्दीपत्र प्रसिध्द करण्यात आले. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, पश्चिम-मध्य विभाग कार्यालय, न्यू सेक्रेटरिएट इमारत, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर- ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय- पुणे, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पुणे, जिल्हा-पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, पुणे, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, पुणे , उप विभागीय अधिकारी, सासवड, तालुका - पुरंदर, जिल्हा- पुणे, तहसील कार्यालय, सासवड. तालुका- पुरंदर, जिल्हा - पुणे, मुख्याधिकारी, जेजुरी नगरपालिका, तालुका-पुरंदर, जिल्हा-पुणे, ग्रामपंचायत कार्यालये - ढालेवाडी, दौंडज, कोळविहिरे, नाझरे सुपे, वाल्हे, तालुका-पुरंदर, जिल्हा - पुणे, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

समन्वयक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पास एकही सूचना वा आक्षेप प्राप्त झालेला नाही. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. श्री शिंदे यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती डॉ. जयश्री कटारे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती यांना केली व मा. अध्यक्षा, पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने प्रकल्प प्रवर्तकांचे पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली.

श्री दिलीप खेडकर, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे तथा सदस्य, जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना विचारले की सदरहू कंपनी ही लिमिटेड आहे वा प्रायव्हेट लिमिटेड आहे. कंपनीचे संचालक कोण आहेत व त्यांची नावे, व कंपनीचे पर्यावरण सल्लागार कोण आहेत व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी सर्वेक्षण कालावधी काय होता?

त्यावेळी उत्तरे देण्यात आली की सदरहू कंपनी ही प्रायव्हेट लिमिटेड आहे. कंपनीचे दोन संचालक असून त्यांची नावे श्री अहिरे व श्री सुरेशनंदन गुप्ता अशी असून पर्यावरण सल्लागार हे श्री साई मनसा नेचर टेक प्रायव्हेट लिमिटेड हे आहेत व त्यांच्या स्थानिक संघाने सदरहू सर्वेषण मार्च, २०१८ ते मे, २०१८ या कालावधित केलेले आहे.

सदस्य, जनसुनावणी समिती यांनी विचारले की कंपनीत ध्वनि पातळी सर्वेषण केले आहे काय? त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कंपनीत ध्वनि पातळी सर्वेषण केले असून विविध ठिकाणांची ध्वनि पातळी मोजण्यात आली असून त्याची माहिती अहवालात नमूद केली आहे.

सदस्य, जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी विस्तारिकरणासाठी मप्रनि मंडळाची परवानगी घेतला आहे काय याबाबत विचारणा केली. तसेच मप्रनि मंडळाचा परवाना वैध (Valid)आहे काय व परवान्यातील अटी व शर्ती यांची पूर्तता केलेली आहे काय? प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की कंपनीकडे वैध (Valid) परवाना असून त्याची मुदत सन २०२० पर्यंत आहे. तसेच परवान्यातील अटी व शर्ती यांची पूर्तता केलेली आहे. मप्रनि मंडळाच्या निर्देशांनुसार बँक गॅरंटीसादर करण्यात आलेली आहे.

सदस्य यांनी विचारले की हरित पट्टा विकास किती करायला हवा व प्रकल्प प्रवर्तकांनी किती केलेला आहे? पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की ३३% हरित पट्टा विकास करणे बंधनकारक आहे. विस्तारिकरणाची परवानगी घेत असताना सद्यस्थितीतील परवानाच्या अटी व शर्तीची परिपूर्तता करणे बंधनकारक आहे. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की फेजवाईज हरितपट्टा विकसित करत आहेत. मात्र येथे पाऊस कमी असते व लावलेली रोपे टिकत नाहीत असे सांगितले.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी यांनी सांगितले की प्रदान केलेल्या परवान्यातील अटी व शर्तीनुसार स्लॅगची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. सदस्य यांनी स्थानिक वीट उत्पादकांना वीट बनविण्यासाठी स्लॅग का देण्यात आला नाही याबाबत विचारणा केली. तेव्हा प्रकल्प प्रवर्तकाने वेंकटेश्वरा टाईल्स नावाच्या कंपनीस स्लॅग देण्यात येत आहे असे

संगितले. तसेच वाळूस पर्याय म्हणून स्लॅग च्या वापरा बाबत लोकांमध्ये जनजागृत्ती करणे गरजेचे आहे असे मत प्रकल्प प्रवर्तकांनी मांडले.

डॉ. जयश्री कटारे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही सूचना वा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**१) श्री बापूभोरकोळविटे, राहणार –कोळविहिरे गाव, तालुका – पुरंदर, जिल्हा-पुणे, माजी सदस्य, कोळविहिरे ग्रामपंचायतः-**

श्री बापूभोर कोळविटे यांनी बैठक आयोजित केल्याबद्दल कंपनीचे आभार मानले. त्यावेळी, सदस्य, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांना सांगितले की ही बैठक कंपनीने आयोजित केलेली नसून शासनाने / महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केलेली आहे. समन्वयक यांनी सुरवातीस सांगितले आहे की ही सुनावणी का आयोजित केली. प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरणामुळे होणा-या पर्यावरण विषयक परिणामावर स्थानिक जनतेस सूचना, आक्षेप, शंका वा टीकाटिप्पणी सर्वांसमक्ष देण्याची संधि शासनाने दिलेली आहे. त्यासाठी जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. या समितीच्या अध्यक्षा ह्या अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी आहेत.

**श्री बापूभोरकोळविटे, राहणार –कोळविहिरे गाव** यांनी मत व्यक्त केले की येथील शेतकरी दुष्काळास तोंड देत जीवनाशी संघर्ष करत आहे. परिसरात उद्योग यावेत. स्थानिकांचा उद्योगास पाठिंबा आहे. मात्र प्रदूषणामुळे पुढची पिढी बरबाद होऊ नये. कंपन्यांनी प्रदूषण नियंत्रण करावे.

श्री कोळभोर यांनी संगितले की कोळविहीरे, जेजूरी व इतर बाजूच्या गावातील विहरी प्रदूषित झाल्या असून आम्ही ते पाणी शेतालाही वापरत नाही. जरी दुष्काळी भाग असला तरी पाण्याचे नियोजन करुन हरितपट्टा विकसित करावा व निसर्गाने दिलेले पाणी आम्हांस मिळावे अशी विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रस्तावित प्रकल्पामध्ये उत्पादन निर्मिती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर पाण्याची अवश्यकता नसते. प्रकल्पामध्ये प्रामुख्याने शितकरण, इतर वापर व हरित पट्ट्यांची निर्मिती या ठळक गोष्टींकरिता पाण्याची अवश्यकता भासते. नियमानुसार कसल्याच पाण्याचा विसर्ग केला जाणार नाही व कंपनीकडून (Zero liquid Discharge) पद्धती वापरली जाईल.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत प्रदर्शित केले की प्रकल्प स्थानापासून १० कि.मी. परिघातील स्थानिक लोक येथील बैठकीस येणे अपेक्षित असते. तरी प्रत्येक गावातील आलेल्या लोकांनी सूचना उपस्थित कराव्यात. प्रकल्पातील उत्पादन प्रक्रिया व संबिधीत पर्यावरण विषयक सूचना मांडणे अपेक्षित आहे. श्री बापूभोर कोळविटे, राहणार – कोळविहिरे गाव, तालुका – पुरंदर, जिल्हा- पुणे, यांनी सांगितले की जवळचे गाव असेल तर कोळविहिरे आहे. प्रकल्पातील धुराचा त्रास हा कोळविहिरे गावास होऊ नये यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी योग्य प्रदूषण नियंत्रण करावे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्थानिक शेतक-यांच्या जमिनी घेतल्या. उद्योगधंदे आलेच पाहिजेत, पण बंधनकारक असणारे प्रदूषण नियत्रंण याबाबत मप्रनि मंडळाने विशेष लक्ष दयावे.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी गावातून आलेल्यांना त्याचे काही प्रश्न, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

२) **<u>श्री सुरेश उबाळे, राहणार-जेजुरी गाव, तालुका-पुरंदर, जिल्हा-पुणेः-</u>**

प्रकल्पासाठी स्थानिकांनी जमिनी दिल्या. उद्योग आले. उद्योगांनी स्थानिकांना विश्वासात घेऊन प्रदूषण नियंत्रण व पर्यावरणाची काळजी घ्यावी व पर्यावरण चे कार्यक्रम राबवावेत आणि प्रकल्पांनी प्रदूषण न होण्याची काळजी घ्यावी.

अध्यक्षा , पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी कोणाच्या सूचना आहेत काय याबाबत विचारले. त्यांनी मत व्यक्त केले की परिसरातील आजूबाजूच्या व स्थानिकांना बैठकीची माहिती जास्तीत जास्त लोकं पर्यंत पोहचवणे गरजेचं असते. सर्वेषण घेतलेल्या १० कि.मी. परिघातील आठ गावातील सरपंच व ग्रामसेवक बैठकीस येणे अपेक्षित आहे.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात बैठकीची जाहिर सूचना देण्यात आलेली आहे व कार्यकारी संक्षिप्त अहवाल हा बाधित गावातील ग्रामपंचायतीस उपलब्ध करण्यात आलेला आहे. त्या त्या गावातील सरपंचांनी ग्रामस्थांना याबाबत माहिती देणे अपेक्षित होते. त्यांनी बाधित गावातील सरपंच आलेला आहे काय याबाबत विचारणा केली. त्यावेळी सौ. रेखाताई जाधव, सरपंच, दौंडस या उभ्या राहिल्या.

३) **<u>सौ. रेखाताई जाधव, सरपंच, दौडस गाव, तालुका-पुरंदर, जिल्हा-पुणेः-</u>**

प्रकल्पामुळे प्रदूषणाचा त्रास स्थानिकांना होऊ नये. स्थानिकांचा असा अनुभव आहे की स्थानिक युवक युवतींना प्रकल्पात रोजगाराची संधि जास्तीत जास्त देण्यात यावी त्यामुळे गावातील मुला-मुलींना पुण्यास कामास जावे लागणार नाही.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत व्यक्त केले की सरपंच व ग्रामसेवकांनी लोकांना बैठकीची सूचना देणे अपेक्षित होते. त्यांना कागदपत्रे व बैठकीची माहिती दिली का व इतर गावातील सरपंच व ग्रामसेवक आलेले आहेत काय याबाबत विचारणा केली. सौ. रेखाताई जाधव यांनी सांगितले की कंपनीच्या व्यवस्थापकानी (मॅनेजर) येऊन बैठकीची माहिती दिली.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी कुठले सरपंच वा उपसरपंच आहेत काय याबाबत विचारणा केली. उपस्थितांना काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारले की प्रकल्प प्रवर्तकांने कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधीविषयी कुठलीही माहिती सादरीकरणात दिली नसल्याचे सांगितले, तर कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी ही पुढल्या वर्षी लागू होईल असे सांगितले. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्पाचा टर्न ओव्हर कमी असल्याने कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी लागू नव्हता. मात्र सीईआर निश्चितच करु.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थित स्थानिकांनी निर्भयतेने त्यांच्या सूचना वा आक्षेप नोंदवावेत. प्रत्येकाला स्वतःचे असे मत असते. ही जनसुनावणी आहे. शासन आपल्या दारी आलेले आहे.

**४) श्री हरिभाऊ विठ्ठल पवार, राहणार जेजुरी एमआयडीसी, तालुका- पुरंदर, जिल्हा- पुणेः-**

स्थानिक शेतक-यांनी आपल्या जमिनी प्रकल्पांसाठी दिल्या. गेले २०-२५ वर्षे सदरहू कंपन्यातील प्रदूषणाचा त्रास स्थानिकांना होत असे, परंतु आता होत नाही. कारण कि हवा प्रदूषण नियंत्रण प्रणाली अद्यावत करण्यात आली आहे. डाळिंबावर दुष्परिणाम झालेला दिसत नाही. उद्योग वाढण्याची गरज आहे. मात्र प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळले पाहिजेत.

**५) श्री प्रविण सोनार, कर सल्लागारः-**

प्रकल्प प्रवर्तक यांना सीएसआर फंड लागू नव्हता. मात्र प्रकल्पातील उत्पादन वाढल्यामुळे प्रकल्प प्रवर्तकांना तो आता लागू होईल. तर कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी कसा वापरणार (Budget Provision) याबाबत माहिती द्यावी.

प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की सीईआरसाठी वीस लाख रुपये निधी राखीव ठेवण्यात आलेले आहे. या निधीतून कौशल्यविकास, दवाखाना व पिण्याचे पाणी पुरविणे या योजना राबविण्यात येतील.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना निर्भयपणे आक्षेप वा सूचना असल्यास त्या बैठकीत उपस्थित करण्याचे आवाहन केले. बैठकीत उपस्थित करण्यात येणा-या सूचना ह्या स्थानिकांच्या व कंपनीच्याही फायद्याच्याच आहेत. तरी उपस्थितांनी निर्भयपणे त्यांच्या काही सूचना आक्षेप असल्यास त्या नोंदवाव्यात.

सदस्य, यांनी सूचना केली की कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधि खर्च करताना एक योजना तयार करण्यात यावी. उद्योग उभारणीमुळे पर्यावरणाची होणारी हानीकमी होण्यासाठी हरितपट्टा विकास कार्यक्रम व हवा प्रदूषण नियंत्रण कार्यक्रम राबवावेत. अशा योजना तयार करून त्या स्थानिकांच्या सहकार्याने जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून परवानगी घेऊन कार्यक्षमतेने राबविण्यात याव्यात.

श्री बापूभोरकोळविटे, राहणार –कोळविहिरे गाव, माजी सदस्य, कोळविहिरे ग्रामपंचायत यांनी सांगितले की "पाणी अडवा, पाणी जिरवा" ह्या कामांसाठी स्थानिक उद्योगांनी मदत करणे शक्य आहे. मात्र पुण्याहून लोक येतात व मदत करतात. परंतु स्थानिकांची याकामी मदत मिळत नाही.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की अशा योजनांसाठी स्थानिक उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, प्रांत अधिकारी व प्रकल्प प्रवर्तकांची संघटना यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी योजना राबविताना स्थानिक योजनांनाच प्राधान्य देण्यात यावे व त्यासाठी जिल्हादंडाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत प्रदूषण संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या त्रुटी, अडचणी यांची प्रतिपूर्ती करण्याची ग्वाही दिली.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, टिकाटिप्पणी यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा अंतर्भाव हा बैठकीच्या इतिवृतान्तात करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. व तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिकांचे, शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे आभार मानले व बैठकीचे कामकाज पूर्ण झाल्याचे जाहिर केले.

मानीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संपन्न करण्यात आली.

( **नितीन शिंदे**,)
समन्वयक,
पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-१,
मप्रनि मंडळ, पुणे

(**दिलीप खेडकर,** )
सदस्य,
पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे

(**डॉ. जयश्री कटारे**)
अध्यक्षा,
पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, पुणे
जिल्हा-पुणे